# पैसे दो ... जूते लो ...

**मुकुंद टाकसाळे**

"आहा "!

आपल्या बहिणीचे म्हणजे जयश्रीचे लग्न ठरल्याचे ऐकल्यावर माधुरी भिगवणकरची प्रतिक्रिया डिट्टो 'त्या' माधुरीप्रमाणेच होती. "आहा "!

माधुरीने आरशात माना वेळावून, डोळे मोडून, किंवा हाताची बोटं एकत्र आणून अक्षता टाकायचा अभिनय करून (हाही माधुरी दीक्षितप्रमाणेच) दहा बारा वेळा तरी स्वतःशीच तो संगीतमय मधुर शब्द म्हटला - आहा !

माधुरी वयात आली तेंव्हा ' हम आपके है कौन ' हा चित्रपट नुकताच प्रदर्शित झालेला होता. तो तिला इतका आवडला, इतका आवडला की तिनं तो या ना त्या नातेवाईकाबरोबर सात आठ वेळा तरी पाहिला असावा. पुढे पुढे तर थेटरात शिरल्याबरोबर पडद्यावरची माधुरी दीक्षित किंवा सलमान खान आपल्याकडे पाहून हास्य करत आहेत, असेही भास तिला होऊ लागले.

आपलं नाव 'माधुरी' आहे हा ईश्वरी योगायोग आहे असं काहीतरी तिला वाटू लागलं. त्याचबरोबर आपलं आडनाव दीक्षित नसून भिगवणकर आहे याचं तिला मनस्वी वाईट वाटू लागलं. आपण लग्न केलं तर दीक्षित आडनावाच्या माणसाशीच करायचं आणि त्याला आपलं माधुरी हे पहिलं नाव बदलू द्यायचं नाही, हा निश्चय तिनं हम आपके है कौन आणि माधुरी दीक्षितच्या प्रेमात पडल्यापडल्याच केला होता.

घरच्या घरी ती माधुरी दीक्षितची गाणी कॅसेटवर लावून नाच करायची. आपल्या जबरजस्त हिंदीत आणि जबरजस्त इंग्रजीत माधुरीला पत्र लिहिण्याचा तिनं अक्षरशः सपाटाच लावला. अखेर कुठल्यातरी पत्राचा दगड लागून तिला माधुरीचा छापील सहीसहित असणारा फोटोसुध्दा पोस्टाने आला.

"आहा "! ती स्वतःशीच उद्गारली.

हे सारं होईपर्यंत ती कॉलेजच्या पहिल्या वर्षातही येऊन पोहोचली; आणि तिच्या बहिणीचं, जयश्रीचं लग्न ठरलं. खरं तर हे लग्न ठरवायच्या वेळी तिला नगरला साऱ्यांबरोबर जाण्याची फार हौस होती. पण " तुझं तिथं काय काम?" असं तिच्या अंगावर खकसून आई, बाबा आणि नारायण पेठेतले लग्न जमवण्यात एक्स्पर्ट असणारे काका, असे तिघेच जण गेले. ' तीन तिघाडं काम बिघाडं ' होऊ नये म्हणून दगड बरोबर घेतला, परंतु माधुरीला काही त्यांनी बरोबर घेतले नाही. जयश्रीचा ऑलरेडी दाखवण्याचा समारंभ उरकून गेलेला असल्यानं नारायण पेठेतले लग्न जमवणारे काका म्हणाले, " आता तिला तरी कशाला न्यायचयं नगरला? उगाचं भाडेखर्चाला कहार! "

जयश्रीही वरील पालकमंडळींबरोबर जाण्यास फारशी उत्सुक नव्हतीच. किंवा तिला कसलीच उत्सुकता नव्हती.

माधुरीची सारी स्वप्नं जयश्रीनं धुळीत मिळवली होती. तिला वाटत होतं, मोहनीश बहलसारखा एखादा देखणा पुरषोत्तम सलमान खानसारख्या तेवढयाच देखण्या अशा धाकटया भावाला घेऊन घरी येईल आणि तिला मागणी घालेल. परंतु कसचं काय नि कसचं काय!

एक तर जयश्रीचं बाशिंगबळ जड! ' शुभमंगल सावधान वधू वर सूचक मंडळा'त नाव नोंदवून दोन वर्षं लोटली तरी तिचं कुठे जमेना. जिथं तिथं कडक मंगळ आडवा यायचा! अखेर जयश्रीसकट साऱ्या मंडळीने हात टेकले असताना अचानक अहमदनगरच्या या स्थळाचा होकार आला. साऱ्यांनीच सुटकेचा निःश्वास सोडला. त्याचबरोबर हे स्थळ हातचं जाऊ द्यायचं नाही असाही चंग बांधला. जयश्रीनं हे स्थळ खरं तर धड पाहिलसुध्दा नव्हतं. मुलगा नगरमध्ये कुठेतरी नोकरीला आहे आणि त्याच्या एकत्र कुटुंबातली सारी माणसं अंमळ जुन्या वळणाची आहेत, इतकीच माहिती तिला होती.

" दिदी, दिदी....", माधुरी जयश्रीजवळ आली आणि लाडात येऊन पृच्छा करू लागली.

"काय गं? आणि हे बघ, मला हिंदी सिनेमातल्याप्रमाणं दिदीबिदी म्हणू नको, 'ताई' म्हण! ", जयश्री तिच्या अंगावर खेकसली.

" मी म्हणणार! दिदीच म्हणणार ! ", माधुरीही तितक्याच खंबीरपणे म्हणाली, " दिदी, तुला दीर आहे का ग सलमान खानसारखा?"

" रग्गड प्रजा आहे! एक सोडून चार भाऊ आहेत मुलाला आणि दोन बहिणी! एक पैसा सोडल्यास काही कमी नाही मुलाला! " तिरसटपणे जयश्री उद्गारली.

इकडे नगरला मुलाकडच्या मंडळींनी अडवणुकीचा चंगच बांधला होता. हुंडा, मानपान, दागदागिने, पायधुणी, लग्न झालेल्या दोन मुलांच्या बायकांना आणि दोन बहिणींना लुगडी, उर्वरित दोन भावांना शर्ट पँटची कापडं, रुखवताचा तपशील, सासऱ्याला धोतर, सासूला नववारी पातळ, मुलाचा टाय आणि पायजम्यासकट सगळा पोशाख, बँड, जेवणाचं किती पान... लग्न जमवण्यात एक्स्पर्ट असणारे काकासुध्दा प्रत्येक गोष्टीतल्या अडवणुकीमुळे थकले.

कोणताही मुद्‌दा पुढे आला की सासरा (मुलाचा बाप) आडवं लावायचा.

"मुलाचा पोशाख आम्ही करू." ल. ज. ए. अ. काका.

" तपशील आत्ताच लिहा. पोशाख म्हणजे सर्व पोशाख. लिहा - शर्ट, पँट, कोट, पट्‌टा (उत्तम लेदरचा), टाय, पँटच्या खिशातला रुमाल, व्ही. आय. पी. नबाब गंजीफ्रॉक, व्ही. आय. पी. चीच अंडरपँट, मोजे, बूट बाटाचे, रुपये अकराशे नव्याण्णव पैसे पंचाण्णव फक्त, असे लेबल असलेले..."

"पण साधे सातशे आठशेचे बूट...", मुलीचे ल. ज. ए. अ. काका बोलू पाहत होते.

"चालणार नाहीत."

"आजवर आमच्या मुलानं आणि आम्हीही कुठं तडजोड केली नाही. वापरायच्या त्या



**ही कथा श्री. मनोज निरगुडकर यांनी प्रायोजित केली आहे. आपला अभिप्राय त्यांना (manojnirgudkar@mac.com) जरूर कळवावा.**

साऱ्या गोष्टी सर्वोत्कृष्ट वापरायच्या हे तत्व. वर पार्टीकडच्या बायकांसाठी दोन दिवस मोगऱ्याच्या ताज्या वेण्या...."

"ताज्या मोगऱ्याच्या वेण्या की मोगऱ्याच्या ताज्या वेण्या लिहू?" ल. ज. ए. अ. काकांनी नरमाईने विचारलं. त्यावेळी त्यांची नजर मुलाच्या मांडी घातलेल्या तळपायांकडे जात होती. दोन्ही पायांचे मोजे फाटून त्यातले अंगठे बाहेर आले होते. त्यातला एक नाचणारा तळपाय हातात पकडून ' हा सर्वोत्कृष्ट मोजा आहे होय रे कावळया?' - असा खरमरीत प्रश्न ल. ज. ए. अ. काकांच्या मनात शंभरदा आला, परंतु वधूपक्ष असल्याने त्यांनी तो गिळून टाकला.

कमालीच्या काटेकोरपणे आणि हिशेबीपणे याद्या पार पाडल्या. मंडळी परत आली तेंव्हा कुणी आनंदाने दोन शब्दांचा वृत्तांत सांगायलासुध्दा तयार नव्हता. नुसती चिडचिड आणि चिडचिड!

'गुंडाच्या गणपती' जवळचं 'धोत्रे मंगल कार्यालय' ठरवण्यात आलं. हा मूळचा धोत्र्यांचा अंधेरा, जुना वाडा. भाडयानं जागा दिलेले आजूबाजूचे बिऱ्हाडकरू जागा सोडेनात तेव्हा धोत्र्यांनी सरळ वाडयाचं 'कार्यालय' करून टाकलं. त्यामुळे बिऱ्हाडकरूंच्यापैकी जे म्हातारे होते, त्यांचे कान सनई, बँड आणि अनुषंगिक गलबल्याने ठार बहिरे झाले. इतर बिऱ्हाडकरूंचेही कान बाद होण्याच्या मार्गावर होते.

ज्यांची मुलं बारावीला आली, त्यांचा 'निकाल' लावण्यात लग्नाच्या सीझनचा मोठ्ठा वाटा होता. ' जागा सोडत नाही काय? तुमच्या पोरांच भवितव्यच मातीत मिळवतो ! ' असं इरेस पेटून धोत्र्यांनी वाडयाचं कार्यालय करून टाकलं. त्यांचा स्वतःचा नातू बारावीला तीन वेळा आपटला. एक लग्न न झालेली मुलगी होती (वय ४५). तिला प्रत्येक सीझनला कानावर सनया, बँड पडून आणि डोळयादेखत लग्न पार पाडल्याची बघून 'आपलं स्वतःचच लग्न होत आहे' असे भास होऊ लागले होते. तरीही धोत्रे बधले नाहीत, मागे हटले नाहीत. मधला चौक, पडवी, आतल्या दोन तीन अंधेऱ्या खोल्या ते 'कार्यालय' म्हणून अव्याहतपणे भाडयाने देतच राहिले.

'धोत्रे मंगल कार्यालयाच्या सोईनुसार मुहूर्त मुक्रर करण्यात आला. त्याप्रमाणे नगरच्या मंडळींना कळवण्यात आलं. त्यांनी 'सुवर्णस्मृती' का नाही? 'कोहिनूर' का नाही अशी खुसपटं काढली. त्यांच्या कुठल्या तरी दूरच्या नातेवाइकांची लग्न तिथे झालेली असल्याने आपलंही कार्य तिथेच पार पडावं अशी इच्छा होती. मग मात्र ल. ज. ए. अ. काकांचा संयम सुटला. त्यांनी ' पुण्यात लग्नाच्या सीझनमध्ये कार्यालय मिळणं किती कठिण असतं' वगैरे सुनावून आपली पुढच्या वर्षापर्यंत थांबण्याची तयारी असल्यास कोणत्याही कार्यालयात आपल्या मनाप्रमाणे लग्न लावत येईल, मात्र आम्हाला मुलीचं लग्न याच वर्षी पार पाडायचं असल्यानं आम्ही मात्र पुढील वर्षापर्यंत थांबण्यास तयार नाही. कळावे.' अस खरमरीत पत्र जयश्रीच्या भावी सासऱ्यास लिहून टाकलं.

त्या छोटयाशा पोस्टकार्डातच जयश्रीच्या आईच्या सांगण्यावरून त्यांनी ता. क. जोडला. ' आपले कोटाचे, शर्टाचे कापड खरेदी करून ठेवले आहे. आपण इथे येऊन शिंप्याला माप देऊन जावे. बुटाचे मापही बाटा दुकानात लागेल. मुहूर्ताची तारीख जवळ येत आहे आणि शिंप्याने ड्रेस वेळेवर देणे जरूरीचे असल्याने आपण ताबडतोब येणेच करावे.'

" मी सांगतो, मुलगा येणार नाही." नारायण पेठेतले काका म्हणाले.

"का? का?"

"सासरा सोडणार नाही मुलाला."

"म्हणजे?"

"ता. क. ला जोडून अजून एक ता. क. जोडा. आपले एसटीचे जाणे येण्याचे भाडे आम्ही देऊ. सरकारी नोकर आहे तो. टी. ए. डी. ए. शिवाय हलणार नाही तो!" नारायण पेठेतले काका म्हणाले.

नारायण पेठेतल्या लग्न जमवण्याऱ्या काकांच्या हुशारीबद्दल आता मात्र कुणालाच शंका उरली नाही. पत्राच्या 'ता.क.' ला हा 'ता. क.' जोडल्यानंतर मात्र मुलगा आणि मुलाचा धाकटा भाऊ ताबडतोब हजर झाले. मुलाचं नाव रमेश आणि त्याचा धाकटा भाऊ सुरेश.

मुलगा आणि त्याचा भाऊ बघून माधुरी खचलीच. हा मोहनीश बहल? रमेश? आणि त्याच्या बरोबर आलेलं ते पाप्याचं पितर सुरेश, ते सलमान खान? पण जयश्रीचं लग्न ठरल्यापासून तिला घरातलं एकूण दुःखी आणि चिडचिड वातावरण लक्षात आलं होतं. त्याचबरोबर तिच्या हेही लक्षात येऊन चुकलं होतं की जयश्रीचं लग्न हे काही 'हम आपके है कौन' च्या धर्तीवर चालेललं नाही. तो काही आगळा वेगळाच भव्यदिव्य प्रकार आहे. परंतु तरीही तिच्यातली 'माधुरी' मरत नव्हती. आपल्या बहिणीची आणि 'जिजाजी' ची थोडीतरी छेडछाड करावी, त्या निमित्ताने सलमान खानची म्हणजे सुरेशचीही थोडी फिरकी ताणावी असं सारखं तिला वाटत होतं.

आल्याआल्याच रमेशने घोषित करून टाकलं, " आम्ही एसटीनं नाही, तर 'प्रसन्न' च्या 'व्हिडिओ कोच' ने आलो आहोत. आमच्या दोघांना 'व्हिडिओ कोच' चं भाडं मिळालं पाहिजे. " एवढं बोलून त्यानं आपल्या तोंडात 'माणिकचंद' चा अर्धा पाऊच रिकामा केला. सुरेशने उरलेला आपल्या तोंडात सोडला. झालं! दोघांच बोलणच बंद झालं. पुढे पुढे जेव्हा रमेशराव बोलण्यासाठी तोंड उघडायचे तेव्हा फक्त हे असं व्यवहाराचंच बोलायचे. बाकी वेळी तोंडात 'माणिकचंद' गुटखा!

दुसऱ्या दिवशी सुरेश नामक गृहस्थ सिनेमा बघण्यासाठी म्हणून जो बाहेर पडला तो दिवसभर बाहेरच. म्हणाला, " माझी जेवणाची वाट बघू नका. मी मॅटिनी बघणार आहे."

इकडे रमेशराव तोंडात गुटखा नसताना म्हणाले, "कपडेबिपडे शिवताना जयश्रीला बरोबर नेतो. आम्ही एखादा सिनेमाही बघू."

घरच्यांचे चेहरे एकदम गोरेमारे झाले. लग्नाअगोदर हिंडण्याफिरण्याची 'फॅशन' जयश्रीच्या घरच्यांना मान्य होती. परंतु तरीही सिनेमाला म्हणजे...? तिथं अंधार असणार. अंधाराचा गैरफायदा घेऊन रमेशरावांनी काही केलं म्हणजे? छे छे ! हे नाही चालायचं. पण हे रमेशरावांच्या तोंडावर कोण म्हणणार? माणिकचंद तोंडात असणऱ्या त्या बोक्याच्या गळयात घंटा कोण बांधणार?

ही समस्या सोडवण्यासाठी नारायण पेठेतल्या हुशार काकांना लगेच बोलवण्यात आलं.

"आणि जयश्रीला आपण त्यांच्याबरोबर पाठवलं नाही आणि तेवढयासाठी त्यांनी फटकन लग्न मोडलं तर? तिकडची मंडळी तापट डोक्याची आहेत!" जयश्रीची आई म्हणाली.

"पाठवलं तरी अब्रूचा प्रश्न. नाही पाठवलं आणि लग्न मोडलं तरी अब्रूचा प्रश्न." जयश्रीचे वडील म्हणाले.

हुशार काकांनी यावर ताबडतोब तोडगा काढला. ते म्हणाले, "माधुरीला पाठवा दोघांबरोबर."

मग घरच्यांनी हुशार काकांच्या हुशारीचं खूपचं कौतुक केलं. ते काकाही त्यामुळे फुशारून गेले.

तोंडात 'माणिकचंद' धरून फक्त 'अं अं अं'

च्या भाषेत बोलणारा मेव्हणा माधुरीला भलताच गमतीशीर वाटला.  ती तिच्या परीनं त्या दोघांची गोड थट्टा करायचा प्रयत्न करीत होती.  पण रमेशरुपी चाफा बोलेना, चाफा चालेना, चाफा खंत करी काही केल्या फुलेना.

शिंप्याच्या दुकानात शिंप्यानेसुध्दा माधुरीबरोबर रमेशची मापं काढण्याचा प्रयत्न केला. किडमडया रमेशला टेलर म्हणाला, "लग्न ठरल्यापासून छाती फुगलीय वाटतं!"

"अं?"

"जिजाजींच्या पोटाचं माप दुप्पट ठेवा हं. कारण आमची दिदी त्यांना लग्नानंतर थालीपिठं, भजी असे चांगले चुंगले पदार्थ खायला घालेल. मग काय बुवा, एका माणसाची अगदी गंमत आहे!  त्याचं पोट अगदी गणपतीसारखं मोठ्ठं होईल."  माधुरी जिजाजींची थट्टा करण्यासाठी म्हणाली.

"मग काय, ठेवू का दुप्पट माप?"

"अं अं अं..." जिजाजी मुंडी हलवत नको नको या अर्थाने म्हणाले.

तंबाखू थुंकून आल्यावर शिंप्याच्या दुकानात जिजाजी मोकळया तोंडाने एवढंच म्हणाले, "तुझ्या बापानं गंडवलं! पँटचं आणि शर्टाचं कापड स्वस्तातलं घेतलेलं दिसतंय."

त्यावर दिदी रडायला लागली.  मग शिंपी म्हणाला, "सध्या हीच फॅशन आहे साहेब. सध्या प्रत्येक नवरदेव याच कापडाची पँट शिवतो. "

यावर रमेश शिंप्याला फाडकन म्हणाला, "तुम्ही मला शिकवू नका! मी सरकारी नोकरीत हेडक्लार्क आहे. समजलं?"

एवढं म्हणून त्याने आभाळाकडे बघून आ केला आणि 'माणिकचंदचा' पाऊच रिकामा केला.

सिनेमातसुध्दा माधुरी जिजाजी जयश्रीशी थोडफार रोमँटिक वागतील म्हणून हळूच त्या दोघांकडे चोरटया नजरेने पाहत होती.  अखेर ते काहीच करत नाहीत याची खात्री पटल्यावर मग पडद्यावरचा रोमान्स बघितलेला बरा; म्हणून ती तन्मयतेने सिनेमा बघू लागली.

नंतर रमेश म्हणाला, "फालतू सिनेमा च्यायला ! त्यापेक्षा बुटाची खरेदी केली असती तर बरं झालं असतं!"

पण नगरला जायची वेळ आली तरी त्यानं बूट घेतले नाहीत. जयश्रीला त्याची चाल लक्षात आली. इथं सासरा हलक्या किमतीचे बूट घेऊन गंडवणार अशी शंका आल्यानं त्याचे रोख पैसे घेऊन नगरला जायचा विचार होता, हे तिच्या ध्यानात येऊन चुकलं.

"आता बूट नगरलाच घ्यावेत झालं!" असं त्यानं चार पाच वेळा जयश्रीच्या बापापुढे म्हटल्यावर त्यांनी निमूटपणे त्याच्या हातावर ठरल्याप्रमाणे बाराशे रुपये रोख ठेवले.

शर्ट पँटचे खिसे चाचपत रमेश म्हणाला, "माझ्याकडे पाच पैसे सुट्टे नाहीत."

"राहू द्या हो... एवढं काय त्याचं?"

अस नाही.  व्यवहाराला चोख असावं!" रमेश म्हणाला.  "बरं आमचे दोघांचे 'प्रसन्न'च्या कोचचे यायचे जायचे पैसे? सुरेश, त्यांना तिकिटं दाखव बघू..."

"छे छे ! त्याची काय जरुर आहे?  तुमच्या एकाचे द्यायचे तसे सुरेशचेही द्यायचे.  आता ते आम्हाला घरातल्यासारखेच आहेत. काय सुरेशराव, आता पुण्याला आलात सिनेमासाठी की मुक्काम आमच्याकडे!", एवढं म्हणून जयश्रीच्या वडिलांनी चरफडत भाडेखर्च देऊन टाकला.

सुरेश हा अपूर्व गृहस्थ येताना जो बरोबर आला होता, तो परतताना हजर झाला. अधूनमधून जेवायला टपकायचा तेवढाच!

एवढया अनुभवावरून माधुरीने 'हम आपके है कौन' हा सिनेमा पूर्णपणे विसरायला काहीच हरकत नव्हती.  पण नाही!  तिच्यात ती माधुरी

अजूनही काही प्रमाणात शिल्लक होती. तेवढयासाठी बहिणीच्या लग्नात तिने हिरवा टॉप आणि पांढरा परकर अशा पध्दतीचा खास माधुरी स्टाइलचा 'लग्नी' ड्रेस शिवून घेतला होता. एवढचं नव्हे, तर तुळशीबागेतून खास लग्नासाठी म्हणून 'हम आपके है कौन' ची ज्युवेलरी (इयरिंग्ज, गळयातलं इ.) आणून तीही घातली होती. आदल्या रात्रीपासुनच ती हा ड्रेस घालून सज्ज होती. आदल्या रात्री रीतीप्रमाणे 'धोत्रे मंगल कार्यालयात' वऱ्हाड आलं. रात्रीचे दहा वाजले तरी एकेक विधी चालूच होते.वाङ्निश्चय, सीमान्तपूजन, व्याहीभेट, माधुरी 'एच. ए. एच. के.' चे ड्रेस आणि अलंकार घालून इकडेतिकडे अल्लडपणे बागडत होती. जयश्रीचे बिन लग्नाचे दीर इतके खत्रूड होते की त्यांच्याशी बोलायलासुध्दा तिचं मन घेईना. एवढयात काहीतरी निरोप देण्याच्या मिषाने ती वरपक्ष ज्या भागात उतरला होता तिकडे गेली. निरोप जयश्रीच्या सासऱ्याला द्यायचा होता. ती तिकडे गेली तेव्हा तो कुठल्या तरी म्हाताऱ्या बाईला बुटांचा बॉक्स काढून देत होता.

"हा बुटांचा बॉक्स इथं ठेवलाय. मुलगा कपडे बदलायला येईल तेव्हा त्याला घालायला हे बूट द्यायचे."

बूट?

आहा! जयश्रीच्या मनात 'हम आपके है कौन'ची कल्पना आली. बूट लपवून ठेवले तर काय मजा येईल! ओह ! हौ रोमॅन्टिक! आहा!

ती थोडा वेळ इकडेतिकडे करून त्या कोठीच्या खोलीत गेली. तिथली राखणदार म्हातारी पेंगत होती. ते स्वाभाविकच होतं. प्रवासाची दगदग! त्यात अजून कढीभाताचं जेवण नाही. ताठून ताठून अंग आंबून गेलेलं. माधुरीने तिच्या समोरून बुटांचा बॉक्स उचलला. तरी तिला काही समजलसुध्दा नाही.

किती मज्जा! बुटांचा बॉक्स हातात आल्याबरोबर तिच्या डोळयांसमोरचं ते अंधार वाडावजा कार्यालय नष्ट झालं. त्या जागी मोठ्ठी हवेली उभी राहिली. खालच्या हॉलमध्ये व्याहीभेटीच्या निमित्ताने दोन्हीकडले प्रौढ पुरुष एकमेकांना मिठया मारत होते. ती कळकट माणसे नष्ट होऊन त्या जागी तिला 'धिक् ताना धिक् ताना धिक् ताना' अशी नाचणारी हसरी माणसं दिसू लागली. फार कशाला, जयश्रीचे खत्रूड दीरही तिला चक्क 'देखणे' दिसू लागले. सलमान खानसारखे. ती थोडयाच वेळात डोळे मुरडत त्यांना म्हणणार होती, 'पैसे दे दो... जूते ले लो...'

बुटांचा बॉक्स उचलल्याबरोबर तिच्या कानात 'हम आपके'चे संगीत घुमायला लागलं आणि ते जोडे पळवायच रोमँटिक गाणंही. तिनं तो बॉक्स उचलला आणि लपवण्यासाठी कोठीच्या बाहेर आणला. सारे जण हॉलमधल्या समारंभात दंग होते. कुठे लपवावा हा बॉक्स?

आचारी सुधारस करत होते तिथं? स्वयंपाकघरात जोडे? छे छे! मग आपल्याकडे, म्हणजे वधूपक्षाच्या खोलीत? की सनई वाजवत होते त्या वादकांच्या मागे? की भटजींच्या पिशवीत? पण इथे कुठेही ठेवले असते तरी हाहाकार माजला असता. मग वरच्या बाजूला बिऱ्हाडकरू राहत होते तिकडे ती गेली. प्रत्येक खोलीत 'अंताक्षरी' लागली होती. अन्नू कपूर नुसता धमाल उडवून देत होता. एक दोन खोल्यातून कुकरच्या शिटया ऐकू येत होत्या. ती बोळवजा गॅलरीतुन शेवटच्या खोलीपाशी गेली. तिथं भिंतीपाशी कोपऱ्यात अडगळ ठेवली होती. तिथल्या खोक्यापाशी हे नवे बूट ठेवून ती पटकन खाली आली आणि साळसूदपणे जिथं समारंभ चालू होता तिथं जाऊन बसली... आपल्या जिजाजींच्या जवळ.

जिजाजी कपडे बदलायला वर गेले तेव्हा त्यांचे तीर्थरूप ओरडले, "हे बघ रमेश, तुझे कपडे

आणि बूट कोठीच्या खोलीत आईजवळ आहेत. तिच्याकडून मागून घे."

माधुरी यावर गालातल्या गालात हसू लागली. काही क्षणातच मोठं मजेदार नाटय घडणार होतं. मग ती जिजाजींपाशी जाऊन पैसे मागणार होती. 'हम आपके...' मध्ये दोन हजार असतील तर इथं गेला बाजार वीस रुपये तरी सुटायला हरकत नव्हती. 'पैसे दे दो... जूते ले लो...'

रमेश घाबऱ्या घाबऱ्या आवाजात नव्या पोशाखात एंट्री करून म्हणाला, "बाबा, बूट सापडत नाहीत."

"तू म्हणजे असा वेंधळा आहेस नं!" बाबा चारचौघात हे म्हणाले, त्यामुळे रमेशला ओशाळल्यासारखं झालं. तरातरा ते दोघे वर गेले. वरून आरडाओरडा ऐकू येऊ लागला. रमेशचा बाप आपल्या आईवर खेकसत होता, "तुला इथं झोपायला ठेवलीय का? गेले कुठे बूट?"

आई बिचारी निमूटपणे ऐकून घेत होती. रमेशचा म्हातारा बाप चांगलाच भडकला होता. एकूण विधींना जसा उशीर होऊ लागला तसातसा खालचा प्रेक्षकवर्ग अस्वस्थ होऊ लागला. कढीभाताचं जेवण उशिराच होतं. पण उशिरा म्हणजे किती? त्यालाही काय मर्यादा हवी ना?

हुशार काका जयश्रीच्या वडिलांना घेऊन वर गेले.

"काय झालं?" त्यांनी विचारलं.

"बूट सापडत नाहीत." म्हातारा म्हणाला.

"एखाद्या वेळी नगरलाच विसरले असतील." जयश्रीचे वडील म्हणाले.

"किंवा विकत घ्यायचे विसरले असतील." हुशार काका म्हणाले.

यावर मात्र रमेशचा बाप चांगलाच भडकला.म्हणाला, "तुम्हाला 'कोहिनूर' सारखं कार्यालय घ्या म्हणत होतो ते यासाठी. तुम्ही पैसे वाचवलेत. आता बुटांची चोरी झाली त्याला कोण जबाबदार?"

काही क्षणातच नवऱ्या मुलाचे नवे कोरे बूट चोरीला गेल्याची बातमी सर्वत्र पसरली.

"हे बघा, बूट सापडल्याशिवाय आम्ही काही जेवायला येणार नाही", सुरेशचा बाप म्हणाला.

"बूट हरवले हा आमचा अपराध आहे, एकदम मान्य!" जयश्रीचे वडील गयावया करत म्हणाले, "उद्या आपण नवे आणू. पण त्यासाठी जेवण कशाला लांबवायचं?"

मुलांकडल्यांनाही भूक लागलेली असल्याने त्यांनीही 'बरोबर आहे, बरोबर आहे' म्हटलं. पण म्हातारा हटून बसलेला.

"नाही, बूट हाती आल्याशिवाय जेवण नाही!"

"हे पाहा, मी उद्या आणून देतो बूट. वाटल्यास माझ्या कातडीचे जोडे करून तुमच्या मुलाच्या पायांत घालीन. मग तर झालं. ते करायचे झाले तरी चांभार हा उद्याच मिळणार. तेव्हा चला आता.

"पण हा तत्वाचा प्रश्न आहे. तेच बूट मला हवे आहेत. उद्यापर्यंत माझा मुलगा काय अनवाणी फिरणार?" वरपिता हटून बसला.

"या माझ्या चपला घ्या. आमचं काही चुकलं असलं तर त्याच माझ्या टाळक्यात मारा. नाहीतर त्या तात्पुरत्या तुमच्या मुलाच्या पायात असू द्या." वधूपिता गयावया करत म्हणाला.

"या? या स्थळं पाहून झिजलेल्या चपला तुम्ही माझ्या मुलाला पायांत घालायला सांगता? सरकारी हापिसात हेडक्लार्क आहे तो! त्याची नुसती वरकमाईच..." इथं रमेशनं त्यांचा सदरा ओढून त्यांना चूप केलं. इकडे फक्त वधूपक्षाकडलेच नाही, तर वरपक्षाकडलेसुध्दा भुकेले नातेवाईक मुलाच्या बापाला मनातल्या मनात शिव्या घालू लागले. 'चक्रमच आहे हा!' असे उघडपणे म्हणू लागले.

"आपण पोलिसांनाच बोलवू या." मुलाचा बाप म्हणाला.

"पोलिस?" मागून भीमगर्जना ऐकू आली.

" 'धोत्रे मंगल कार्यालया'त पोलिस? शक्य नाही. आजवर जे घडलं नाही, ते यापुढेही घडणार नाही. या धोत्रे मंगल कार्यालयाच्या प्रिमाइसेसमध्ये हा धोत्रे पोलिसांना पाऊल टाकू देणार नाही.

धोत्र्यांनी त्या कोंदट वाडयाला 'प्रिमाइसेस' वगैरे शब्द वापरणं म्हणजे फारचं होतं.

इथून पुढे सारी सुत्रे न सांगताच धोत्र्यांनी हाती घेतली. धोत्र्यांनी पुन्हा पहिल्यापासून सारं रामायणं सुरू केलं. खरेदी केल्या केल्या बूट बरोबर घेतले का? का दुकानातचं ठेवले? नंतर इथं आणले का? आणल्यावर कुठे ठेवले? तिथंच का ठेवले? खाली का नाही आणले?.... प्रश्नांचा नुस्ता भडिमार! पोलिस परवडले, पण हा धोत्र्या नको, अस मुलाच्या बापाला होऊन गेलं. "मी सांगतो, हे त्या जोश्याचंच काम!" धोत्रे निष्कर्षाप्रत येत म्हणाले.

धोत्रे एवढं म्हणायचा अवकाश, की वरून फाटका गंजीफ्रॉक आणि चटयापटयाची अंडरपँट या अशा पोशाखात तरातरा एक माणूस धावत खाली आला. "तोंड सांभाळून बोला धोत्रे!"

"काय करणार आहेस तु माझं जोश्या?"

"सभ्य माणसासारखं 'जोशी' म्हणा. आणि आमच्यावर वाट्टेल ते आरोप करू नका."

"करणार! एकदा सोडून दहादा करणार. वाडयाचं 'कार्यालय' केल्यानं तूच भाडेकरूंची युनियन केलीस. तूच पोलिसात बँडचा आणि सनईचा त्रास होतो अशी माझ्याविरुध्द तक्रार केलीस. तूच 'आमची पोरं नापास होतात आणि म्हातारी माणसं आजारी पडून मरतात', अशी वर्त मानपत्रात पत्रं लिहून माझी बदनामी केलीस."

"खोटं आहे का ते? माझीच वृध्द आई मेली."

"खोटं! ती हार्ट अ‍ॅटॅक येऊन मेली."

"का? का आला तिला अ‍ॅटॅक? त्यावेळी खाली जोरजोरात बँड वाजत होता म्हणून. आणि माझा मुलगा तर रोजच्या या 'कार्या'मुळे शनवारवाडयात जाऊन बसतो अभ्यासाला."

"बरोबर आहे! फुकटचा वाडा मिळाला की वापरायचा, असं बापासारखंच धोरण आहे त्याचंही. एवढा त्रास होतो तर सोडा जागा. जुनं वीस रुपये भाडं भरून राहायचं आणि वर मिजास ताजमहल हॉटेलमध्ये राहत असल्यासारखी करायची!"

"मुद्यावर या. जोडे कुठे आहेत यांचे?"

"कुठं आहेत?"

"तुम्ही आमच्यावर नाव घेताहात तर घ्या आमची झडती. या कपडयात तर काही लपवण शक्य नाही." जोशी होते ते कपडे झटकतं म्हणाला.

"तुमच्या घराची झडती घ्यायला पाहिजे.

"चला... लगेच चला!"

दहा वीस जणं गॅलरीतल्या अरुंद पायवाटेतून शेवटच्या कोपऱ्यात गेले. तिथली अडगळ जरा उचकताच बुटांचा बॉक्स दृष्टीस पडला. रमेशचा बाप एकदम आनंदित झाला आणि त्यावर झडप मारून बूट घेऊ लागला.

"थांबा!" धोत्रे कडाडले. आत्ता पोलिस बोलवतो आणि जोश्याला बेडयाच ठोकतो! हे कार्यालय चालू नये, इथं चोऱ्या होतात, अशी बदनामी व्हावी, म्हणून मुद्दाम तू हे जोडे चोरलेस!"

जोशीही ते जोडे खरोखरच आपणच चोरल्यासारखा त त प प करू लागला. इथं इतर भाडेकरू आपल्या मदती ला येतील अशा आशेने तो त्यांच्याकडे बघू लागला; पण 'कठिण समय येता कोण कामास येतो?'

पुन्हा एकदा रमेशचा बाप बुटांचा बॉक्स उचलू लागला.

"थांबा.  तुमच्या हातांचे ठसे त्यावर उमटू देऊ नका.  नाहीतर पोलिस तुम्हालाच चोर म्हणून पकडून नेतील."

धोत्र्यांनी हे म्हटल्यावर रमेशचा बाप चपापला.  जयश्रीचा हुशार काका धोत्र्यांना समजावयला गेला तर धोत्रे म्हणाले, "तुम्हाला कल्पना नाही या माणसानं किती छळलंय मला ते!  आणि आता बुटांची चोरी!  कार्यालय बंद करून रस्त्यावर भीक मागायची पाळीच माझ्यावर यावी, यासाठी हा सारा प्रयत्न आहे.  पण मी पण याला तुरुंगात धाडल्याशिवाय राहणार नाही!  बिऱ्हाडकरूंची युनियन करतोस काय माझ्याविरुध्द?"

"अहो..." जोश्यांच्या बायकोनं हळूच जोश्याला बोलावून घेतलं.

"काय गं?  जोश्यांना वाटलं, ती धीर द्यायलाच बोलावते आहे.  पण तिची चिंता वेगळीच होती.

"हे बघा, तुरुंगात जायची वेळ आली तर निदान बुशशर्ट, पायजमा तरी घालून जा.  या अशा अंडरपँटवर आणि फाटक्या गंजीफ्रॉकवर तिथं जाऊन लाज नका आणू आम्हाला!"  ती म्हणाली.

आता जेवणाच्या पंगती बसायला बराच वेळ लागणार हे लक्षात येऊन स्थानिक नातेवाईक स्कूटरींना किका मारून आपापल्या घरी गेले.  बाकी जागेवरच पेंगू लागले.  रमेशनेही आ करून तोंडात माणिकचंद गुटखा सोडला.  प्रकरणाला भलतेच वळण लागलेलं पाहून माधुरीला अपराधी वाटू लागलं.  तिनं रमेशला बाजूला घेऊन सारा खुलासा केला, "जिजाजी, खरं तर या साऱ्या प्रकाराला मी जबाबदार आहे."

"अं?"

"म्हणजे 'हम आपके है कौन' मधल्या माधुरीप्रमाणे जोडे लपवून पैसे मागण्याचा माझा विचार होता."

"अं... अं...अं..."

याचा अर्थ काय तो माधुरीला उमजेना.

"मी जाऊन तुमच्या बाबांना सांगू का?" माधुरीने विचारले.

"अं...अं..."  याचा अर्थ त्याने मुंडी हलवल्याने 'नको नको' असा आहे हे तिच्या ध्यानी येऊन चुकलं.

हे संभाषण त्यांच्या शेजारी पाठ करून उभी असणारी जोश्यांची बायको ऐकत होती.  इकडे जोश्याला ताणण्यासाठी धोत्रे म्हणाले, "तू जर भाडं वाढवून देणार असशील तरच सोडतो.  तुझं आणि साऱ्यांचं..."

जोशी 'हो' म्हणणार एवढयात तिथं हसत हसत जोशीबाई आली आणि म्हणाली, "अहो, कसली चोरी न् कसलं काय!" हा सगळा त्या पोरीचा प्रताप!  ही अलीकडची पोरं!  सिनेमे बघायचे अन् तसं वागायचं!  जोडे लपवून तिला आपल्या जिजाजींकडून पैसे वसूल करायचे होते.  होय नं गं लबाडे?"

माधुरीनं खाली मान घालून निमूटपणे 'हो' म्हटलं.  आपले भाडे वाढवून घ्यायचा चान्स गेला म्हणून धोत्र्यांच्या अंगाचा तिळपापड झाला.  जोश्यालाही आता जोर चढला.

"इतकी वर्षं इथं प्रामाणिक राह्यलो.  कुणी चोरीचा आरोप नाही केला आमच्यावर!  धोत्रे, खोटे आरोप करून आमचं मनःस्वास्थ्य बिघडवल्याबद्‌दल तुम्हालाच कोर्टात का खेचू नये?"  असा बिनतोड सवाल त्यांनी केला.

यावेळी निरूत्तर होण्याची पाळी धोत्र्यांची होती.

माधुरीवर सारेच चिडले.  जयश्री, आई, बाबा, रमेशचा बाप, जेवणासाठी खोळंबलेली भुकेली मंडळी... सारेच जण तिला कडाकडा बोलू लागले.

या प्रकरणानंतर मात्र माधुरी भिगवणकर पूर्ण शहाणी झाली.  नंतर तिच्यातली माधुरी

दीक्षित पुन्हा कधीच जिवंत झाली नाही.

---

प्रिय वाचक,
मराठीतील दर्जेदार साहित्य आपल्यापर्यंत पोहोचवायचा आमचा हा प्रयत्न आहे. आपला अभिप्राय आम्हांला (marathikatha@gmail.com) व प्रायोजकांना (manojnirgudkar@mac.com) जरुर कळवावा.

आम्ही प्रकाशित केलेल्या इतर कथा वाचण्यासाठी आमच्या संकेतस्थळास भेट द्या.
http://geocities.com/marathikatha2005/list.html

Copyright ©
सर्व हक्क लेखकाकडे स्वाधीन. या कथेची soft copy आपण वापरु शकता. परंतु अन्य उपयोगासाठी लेखकाची परवानगी आवश्यक आहे.
Document no m0400100007